# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या आडोतीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२९ नोव्हेंबर, २०११ सकाळी ११:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची आडोतीसावी सभा मंगळवार, दि.२९/११/२०११ रोजी सकाळी ११:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मंडळ | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| १०) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ११) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १२) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १४) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १५) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

श्री. बी. आर. गायकवाड यांनी व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.११ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.११ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव : मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत M.Ed. या कोर्सच्या अध्यादेश क्र. १६ मधील (O. Ed. 3 Standard of Passing) मध्ये सुधारणा करुन, सुधारीत केलेल्या अध्यादेशास मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देऊन, केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(**टिपणी -** Education Psychology अभ्यासमंडळाच्या दि. २३/८/२०११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ३ नुसार M.Ed. या कोर्सच्या अध्यादेश क्र. १६ मधील (O.Ed. Standard of Passing) मध्ये सुधारणा करुन, सुधारीत केलेले अध्यादेश अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेला आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखा दि. २३/०८/२०११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार उक्तप्रमाणे सुधारीत केलेले अध्यादेश विद्याशाखेने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेला आहे.

उक्तप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५४ (१) नुसार, अध्यादेशामध्ये सुधारणा केल्याच्या बाबीस मा. कुलगुरु महोदयांनी म.वि.का. १९९४ कलम १४(७) अन्वये, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता दिलेली आहे.

**सबब, शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत M.Ed. या कोर्सच्या अध्यादेश क्र. १६ मधील (O. Ed. 3 Standard of Passing) मध्ये सुधारणा करुन, सुधारीत केलेल्या अध्यादेश जून, २०११ पासून अंमलबजावणी करावयाची असल्याने, मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).**

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] महाराष्ट्र शासने सर्व विद्यापीठे व संलग्नित समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र. एसडब्ल्युसी-२००९/सी.आर.१७२पीएआरटी-२/एसयुडीएचएआर-१, दिनांक २२-०९-२०११ अन्वये सबब लागू करण्याची बाब व शासन निर्णय माहितीस्तव.**

(**टिपणी** : महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यापीठे व संलग्नित समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र. एसडब्ल्युसी-२००९/सी.आर.१७२पीएआरटी-२/एसयुडीएचएआर-१,दि.२२-०९-२०११ अन्वये कळविले आहे.

प्रस्तुत विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या १) वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर २) भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्राचार्य व शिक्षक कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करुन लागू करण्याबाबतची बाब शासन निर्णय माहितीस्तव).

**ठराव : महाराष्ट्र शासने सर्व विद्यापीठे व संलग्नित समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र. एसडब्ल्युसी-२००९/सी.आर.१७२पीएआरटी-२/एसयुडीएचएआर-१, दिनांक २२-०९-२०११ अन्वये लागू करण्यात आल्याच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ] शै.वर्ष २०१२ -१३ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून नैसर्गिक विस्तारांच्या प्राप्त प्रस्तावांना शिफारसी करण्याची बाब विचारार्थ.**

[ टिपणी - शै.वर्ष २०१२-१३ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए.आय.सी.टी.ई अंतर्गत अभ्यासक्रमाच्या व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) अन्वये प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारसीकरीता सादर करुन त्यांच्या शिफारसीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारसीस्तव सादर करणे आवश्यक आहे. व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारसीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीस्तव विहीत वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

शै.वर्ष २०१२-१३ पासून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना विहीत वेळेत कार्यवाही होण्यासाठी व नजीकच्या काळात महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभा आयोजित होणार नसल्याने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७ ) अन्वये शिफारसी केलेल्या आहेत.

सबब शै.वर्ष २०१२-१३ पासून संलग्नित महाविद्यालयांच्या अनुदानित व कायम विना अनुदानित तत्वावरील नैसर्गिक विस्तारांच्या प्राप्त प्रस्तावांना महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारसी विचारार्थ).

**ठराव : शै.वर्ष २०१२ -१३ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून नैसर्गिक विस्तारांच्या प्राप्त प्रस्तावांसंदर्भात महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] दि.२१/११/२०११ च्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी : दि.२१/११/२०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.२१/११/२०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ).

**ठराव : दि.२१/११/२०११ च्या वित्त व लेखा समितीच्या कार्यवृत्तांतास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **वि. व ले. स. ठराव क्र. १** | **नोंद घेण्यात आली.** |
| **वि. व ले. स. ठराव क्र. २** | **मान्यता देण्यात आली.** |
| **वि. व ले. स. ठराव क्र. ३(१)** | **मान्यता देण्यात आली.** |
| **वि. व ले. स. ठराव क्र. ३(२)** | **मान्यता देण्यात आली.** |
| **वि. व ले. स. ठराव क्र. ३(३)** | **वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारुन एकूण रु.५ लाखापर्यंतची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**[ ०७ ] शिक्षक व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात शासन निर्णय क्रमांक - प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५ दिनांक ०३ मार्च, २०१० नुसार सुधारणा करण्याबाबत विचारार्थ.**

**(**टिपणी :. वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५ दिनांक ०३ मार्च, २०१० नुसार विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याची बाब विचारार्थ**).**

**ठराव : शिक्षक व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरातशासन निर्णय क्रमांक - प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५ दिनांक ०३ मार्च, २०१० नुसार सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ]** **मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांचे दंडाच्या रकमेबाबतचे पत्र विचारार्थ.**

(टिपणी: वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने सन २००६-०७ पासून विद्यापीठाचे संलग्निकरण - नसताना बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी सुरु केलेली आहे व विद्यार्थी प्रवेशित केलेले आहेत व तसेच शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडया सुरु केले असल्याचे व मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांनाही आज अखेर प्रवेशित केलेले असल्याचे निदर्शनास आले आहे.
त्याअनुषंगाने सदरचा विषय दि.२६.०४.२०११ रोजीच्या विद्या परिषदे समोर विषय क्रं २२० अन्वये सादर केला असता ठराव क्रं २२० नुसार खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.
**"उपरोक्त संदर्भात दंडाबाबतची योग्य ती कार्यवाही करुन सदर तुकडयांना व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस प्रथम संलग्निकरण द्यावे अशी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."**
विद्या परिषदेच्या उपरोक्त ठरावान्वये सदरचा विषय दि. १९.०५.२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदे समारे विषय क्रं १६ अन्वये विचारार्थ सादर केला असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.
**" सदरचा विषय पुनःश्च सादर करावा असे ठरले "**
उपरोक्त ठरावानुसार सदर महाविद्यालय उपरोक्त प्रमाणे विद्यापीठाच्या परवानगीशिवाय विद्यार्थी प्रवेशित केल्याची बाब दि.२१.०७.२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्रं २३ अन्वये पुर्नःविचारार्थ सादर केला असता व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.
**"नियमानुसार दंड आकारणीचे पत्र देवून त्यासंदर्भात पुढील कार्यवाहीचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्यात आले. "**
उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने शै.वर्ष २००६-०७ ते शै.वर्ष २०१०-११ पर्यंत सदर मान्यता न घेतलेल्या तुकडीमधून एकूण ९५१ विद्यार्थी प्रवेशित केलेल्यामुळे अध्यादेश ०.४४ (ii) व ०.४४ (iii) अन्वये महाविद्यालयास खालील प्रमाणे दंड आकारण्यात आला होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **O.४४ (ii) नुसार मान्यता न घेतलेल्या उपरोक्त तीन तुकडयांचा दंड ३ X १,००,०००=** | = | **३,००,०००/-** |
| २. | **O.४४ (iii) नुसार मान्यता न घेता विद्यार्थी प्रवेशित केल्याबाबत दंड ९५१ X ८००=** | = | **७,६०,८००/-** |
| | **एकूण दंड रक्कम रुपये** | = | **१०,६०,८००/-** |

उपरोक्तप्रमाणे एकूण रु.१०,६०,८००/- दंड भरण्याबाबत महाविद्यालयाला पत्राव्दारे कळविण्यात आले होते. (प्रपत्र अ)
उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय यांनी सदर महाविद्यालय हे सोलापूर हद्दवाढ भागातील असून गरीब, होतकरु व बहुतांशी मगासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेतात.
शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहू नये या हेतूने महाविद्यालयात कायम विना अनुदान तत्वावरील तुकडयात जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला तसेच त्यांच्यांकडून कोणतीही देणगी किंवा अधिकचे शुल्क घेण्यात आलेले नाही त्यामुळे दंडाची रक्कम माफ करावा असे पत्रान्वये कळविले होते. (प्रपत्र ब)
तथापि सदरची विनंती अमान्य केल्याचे व त्वरीत उपरोक्त दंडाची रक्कम भरण्याबाबत विद्यापीठाने महाविद्यालयास कळविले होते. (प्रपत्र क) तसेच वेळेत दंड न भरल्यामुळे महाविद्यालयास दंड भरण्याबाबत स्मरणपत्रही पाठविण्यात आले होते.् (प्रपत्र ड)
त्याअनुषंगाने मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांनी उपरोक्त दंडाच्या रक्कमेपैकी रु.३ लाख इतकी रक्कम दंडापोटी स्विकारुन उर्वरीत रक्कम माफ करण्याबाबत दि.१५.११.२०११ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.
**सबब मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांचे दंडाबाबतचे पत्र विचारार्थ).**

**ठराव :** **मा. प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांना करण्यात आलेल्या एकूण दंड रु.१०,६०,८००/- पैकी रु.३,००,०००/- इतकी रक्कम दंडापोटी स्विकारण्यास व उर्वरीत रक्कम रु.७,६०,८००/- माफ करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभा सदस्यांनी दि.०९ डिसेंबर, २०११ रोजी होणाऱ्या सभेकरीता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव : सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्य. प. सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

## विषय क्र. ०९ वरील ठरावानुसार तयार करण्यात आलेली प्रश्नोत्तरे

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **श्रीमती विभूते एस. बी.** | | ● **ॲड. सलगर बी. एस.** |
| | १ | सिनेट सदस्यांनी विद्यापीठाकडे विद्यापीठाच्या कामकाजासंबंधी मागीतलेली माहीती त्यांना दिली जाते का ? | होय. |
| | | ● नसल्यास त्याचे कारण काय? | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | | ● आजपर्यन्त अशा किती सदस्यांनी अशी माहीती मागीतली आहे ? | एकही नाही. |
| ● | **डॉ. इंगोले के. जे.** | | ● **डॉ. सूर्यवंशी ए. बी.** |
| | २ | महाराष्ट्र शासनाच्या दि. ५ जाने ११ च्या संगणकीय कार्ड प्रणाली परिपत्रकाची तंतोतंत अमलबजावणी केली आहे काय ? | शासन परिपत्रकानुसार सर्व महाविद्यालयांना अंमलबजावणीसाठी कळविण्यात आले आहे. |
| | | ● संगणकीय कार्डप्रणाली महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्तीशी संबंधीत असलेमुळे शिक्षकांच्या परिनियमात तसे बदल केले आहेत काय ? | नाही. |
| | | ● तंतोतंत अमलबजावणी करणेबाबत SUTA ने काही पत्रे पाठविली आहेत काय? | होय. |
| ● | **श्री. चौगुले एस. एस.** | | ● **प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.** |
| | ३ | महाविद्यालयातील किती शिक्षकांना Professor पद देण्यात आले आहे ? | अभियांत्रिकी महाविद्यालयात १० शिक्षकांना प्राध्यापक पद देण्यात आले आहे. |
| | ४ | विद्यापीठातील अधिविभागात (school) २०११-१२ या वर्षात किती प्राध्यापक व किती सहयोगी प्राध्यापक नेमलेले आहेत ? | ०१ प्राध्यापक, ०१ सहयोगी प्राध्यापक. |
| | ५ | सोलापूर विद्यापीठाचे परिनियम तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीने परिनियम तयार केले आहेत काय ? | कार्यवाही सुरु आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **श्री. गायकवाड एस. पी.** | | ● **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | ६ | विज्ञान विद्या शाखेत संशोधक म्हणून कार्य करण्यासाठी संशोधकाने पूर्ण वेळ संशोधन केले पाहीजे अशी सम्मती कोणत्या अधिकार मंडळाने दिलेली आहे ? | विज्ञान विद्याशाखेतंर्गत विभागीय संशोधन समितीने असा ठराव संमत केला आहे. |
| | ७ | वनस्पतीशास्त्र या विषयात Ph.D. करण्यासाठी किती उमेदवार पात्र होते ? | १२ |
| | | ● किती उमेदवाराना प्रवेश दिला आहे? | एकही नाही. |
| | | ● दिला नसल्यास का दिला नाही ? | कारण पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीन्वये संबंधित मार्गदर्शकाने दिलेल्या संमतीपत्रानुसार गुणानुक्रमे ४ विद्यार्थ्यांना विभागीय संशोधन समितीसमोर मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी २ विद्यार्थी अनुपस्थित व उर्वरीत २ विद्यार्थ्यांना Area Specialization Mismatch मुळे विद्यार्थी प्रवेशित केलेले नाहीत. |
| ● | **डॉ. भोसले यु. व्ही.** | | ● **डॉ. सूर्यवंशी एस. एस.** |
| | ८ | २०१० च्या UGC Regulation प्रमाणे तयार केलेल्या Self apprisal form चे विस्तारीकरण (detailing) करण्यासाठी SUTA संघटनेने विद्यापीठाला पत्र दिले आहे काय ? | होय. |
| | | ● Self apprisal form चे विस्तारीकरण करणेसाठी विद्यापीठाने समिती नेमावी असे पत्र SUTA ने दिलेले होते काय ? | नाही. |
| | | ● विद्यापीठाने समीती न नेमण्याचे कारण काय? | समिती नेमली आहे. |
| ● | **डॉ. शिंदे एस. व्ही.** | | ● **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | ९ | विद्यापीठाच्या परिक्षेच्या कामकाजात झालेल्या चुकामुळे अधिकार मंडळावरिल किती सदस्यांवर विद्यापीठाने कारवाई केली आहे ? | दोन |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • असल्यास कोणती कारवाई, कोणविरुध्द केली आहे त्याची नावे कोणती ? | • प्रा. डॉ. बी. एस. बिराजदार यांना रु.१०,०००/- दंडासह सप्टेंबर २०१४ पर्यंत परीक्षा कामातून निष्काशित करण्यात आले आहे. त्यानुसार म.वि.का. १९९४ मधील कलम ४४ (ई) नुसार त्यांचे मराठी अभ्यासमंडळ व अधिसभेवरील सदस्यत्व संपुष्टात आले आहे.<br>• प्रा. श्रीमती उषा सासनूर यांना रु.३,०००/- दंडासह सप्टेंबर २०१४ पर्यंत परीक्षा कामातून निष्काशित करण्यात आले आहे. त्यानुसार म.वि.का. १९९४ मधील कलम ४४ (ई) नुसार त्यांचे इंग्रजी अभ्यासमंडळ व कला व ललित कला विद्याशाखेवरील सदस्यत्व संपुष्टात आले आहे. |
| | १० | सन २०११-१२ या शैक्षणीक वर्षात विद्यापीठाच्या विविध शैक्षणीक संकुलात किती प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक नेमलेले आहेत त्यांची नावे व त्यांच्या नेमुकीच्या वेळचा क्रायटेरीया निहाय API Score किती होता ? | -दोन<br>-डॉ. राजपूत जी. जी. प्राध्यापक (API - 424)<br>-डॉ. हेगडी आर. एस. सहयोगी प्राध्यापक (API-397) |
| • | **डॉ. भिलेगावकर एस. डी.** | | • **प्राचार्य डॉ. गणगे के. एन.** |
| | ११ | M.Phil. (शिक्षणशास्त्र) च्या प्रवेश समिती सदयांची पात्रता / निकष काय आहेत ? | याबाबत स्वतंत्र नियमावली नाही. |
| | | • त्या समितीत कोणकोण होते ? | संबंधित विभागप्रमुख व शिक्षक होते. |
| | १२ | दिनांक २४.१२.२०१० रोजीच्या अधिसभेत School of life Science ची स्थापना करण्याचा ठराव एकमताने झाला होता त्याची काय कार्यवाही झाली आहे ? | सदरचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. |
| • | **डॉ. कोळेकर टी. एन.** | | • **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | १३ | प्राचार्यपदाच्या नेमणूकीस मान्यता देताना API व वेटेज पॉईट पुर्ण करण्याच्या अटीवर पदमान्यता दिली आहे काय ? | नाही. |
| | | • असल्यास कोणत्या महाविद्यालयातील प्राचार्याना अशी मान्यता दिलेली आहे ? | प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | १४ | UGC Regulation ला विद्यापरिषदेने मान्यता देणे आवश्यक आहे काय ? | नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. चव्हाण सी. एस.** | | ● **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १५ | विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देण्यासंबंधी काय कार्यवाही करण्यात आली आहे ? | यासंदर्भात कार्यवाही चालू आहे. |
| | १६ | Ph.D. संशोधन सुविधा केंद्राकरिता नेमण्यात येणाऱ्या स्थानिक चौकशी समिती करिता Ph.D. प्राप्त नसणाऱ्या प्राध्यापकांची सदस्य अथवा अध्यक्ष म्हणून नेमणूक करता येते काय ? | होय |
| | १७ | ३२/५ च्या समितीची बैठक केवळ अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांना बोलावून घेणे कायदेशिर आहे काय ? | नाही |

**<u>मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :</u>**

**[ 10(1)] The minutes of Building and Works Committee meeting dt.29/11/2011 for consideration.**

(Note : The meeting of Building and Works Committee was held on 29/11/2011 at 10:00 a.m. at University Office. The minutes of the said meeting are to be placed for approval of Management Council as per Statute 339 (f).

Hence, the minutes of Building and Works Committee dt.29/11/2011 placed for consideration).

**Resolution: The minutes of Building and Works Committee meeting dt.29/11/2011 are considered and duly approved by the Management Council.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**